स्थापना वर्ष : २००८



जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठाण, भोपणी द्वारा संचलित...

# कै. रसिका महाविद्यालय, देवणी

जि.लातूर (महाराष्ट्र)

**NAAC Accredited 'B' grade**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा संलग्नित...

- महाविद्यालयातील उपलब्ध अभ्यासक्रम - (बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए., बी.सी.एस.)
- य.च.म.मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र - (बी.कॉम., पुर्वतयारी)
- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे - बी.ए, बी.कॉम., एम.कॉम., एम.ए.(सर्व विषय)

प्राचार्य : ९७३०३६१८०४ कार्यालय दुरध्वनी : ०२३८५-२६९५५५




# माहिती पुस्तिका २०१८-२०१९

www.kairasikamahavidyalaya.com e-mail : rasikadeoni399@gmail.com

Scanned with OKEN Scanner



महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी ॲरो प्लांट



महाविद्यालयातील विविध खेळाची मैदाने



महाविद्यालयातील सुसज्ज संगणक लॅब



महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग प्रशिक्षण शिबीर



महाविद्यालयातील वार्षीक स्नेह संमेलन २०१७-१८ मध्ये नृत्य सादर करताना विद्यार्थी



महाविद्यालयातील सुसज्ज वनस्पतीशास्त्राची प्रयोगशाळा

Scanned with OKEN Scanner

## * आमचे प्रेरणास्थान *



## मा.श्री.गोविंदरावजी भोपणीकर साहेब

अध्यक्ष, जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठाण, भोपणी

Scanned with OKEN Scanner

## संस्था अध्यक्षांचे मनोगत....

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व्हावी यासाठी ग्रामीण भागातील व कर्नाटक सीमाभागातील वंचित, गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने कै. आबासाहेब भोपणीकर यांच्या संकल्पनेतून कै. रसिका महाविद्यालयाची उभारणी करण्यात आली.

पुर्वी या भागातील विद्यार्थी व विद्यार्थीनी 10 वी 12 नंतर जिल्हयाच्या ठिकाणी उच्च शिक्षणासाठी जात असत. तेथील महागडे शिक्षण घेणे त्यांना शक्य नसल्याने व मुलींना बाहेरगावी पाठविण्याची पालकांची मानसिकता नसल्याने ब–याच विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण पूर्ण होवू शकले नाही. पण आमच्या महाविद्यालयाने दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देवून विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रात भरारी घेण्यास प्रोत्साहन दिले, घडवले आहे. महाविद्यालयाचा मागील 4–5 वर्शाच्या प्रगतीचा आलेख उंचावत चाललेला आहे. महविद्यालयातील सर्व प्राध्यापकांची निवड गुणवत्तेच्या आधारे करण्यात आली आहे. नेट, सेट, पी.एचडी. धारक व परदेशातून संशोधन कार्याचा अनुभव असलेल्या प्राध्यापकांची निवड केल्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात आहे. निसर्गरम्य परिसरातील भौतिक सुविधांनी, परिपूर्ण अशा भव्य इमारतीत विद्यार्थ्यांना सर्व सुविधा दिल्या जातात याचा मला आनंद आहे.

भविश्यात अधिक दर्जेदार, गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी संशोधन केंद्र, इनडोअर स्टेडीयम, प्रोजेक्टर, अशा सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत व केजी टू पी.जी.शिक्षण देण्यात येणार आहे. (या भागातील व कर्नाटक राज्यातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयात निवासी वसतिगृहाची सोय करण्याचा आमचा मानस आहे.)

महाविद्यालयाच्या या प्रगतीत परिसरातील विद्यार्थी पालक वर्गाने आजपर्यंत सहकार्य दिल्यामुळे महाविद्यालयाने अल्पावधीत शिक्षणक्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण केली याचा मला अभिमान वाटतो. महाविद्यालयात प्रवेश घेणा–या सर्व विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा !


**श्री गोविंदराव भोपणीकर**
**अध्यक्ष,**
**जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठाण भोपणी**

Scanned with OKEN Scanner



**मा.श्री.गजाननजी भोपणीकर साहेब**

सचिव, जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठाण, भोपणी



**प्राचार्य डॉ.कुणाल बडदे**

कै.रसिका महाविद्यालय, देवणी

Scanned with OKEN Scanner

# Contents


| | | |
|---|---|---|
| 01 | महाविद्यालयाची वैशिष्ट्ये | 02 |
| 02 | महाविद्यालय प्रवेशाची नियमावली | 03 |
| 03 | महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम | 04 |
| 04 | विज्ञान विभाग | 05 |
| 05 | फिस संदर्भातील नियम | 06 |
| 06 | Prize from Honorable Persons | 07 |
| 07 | ग्रंथालय विभाग | 08 |
| 08 | राष्ट्रीय सेवा योजना (NSS) | 09 |
| 09 | शिष्यवृत्ती व ई.बी.सी. विषयक माहिती | 10 |
| 10 | विद्यार्थ्यांसाठी राबविले जाणारे उपक्रम/योजना | 12 |
| 11 | स्वा.रा.ती.म.वि.,नांदेड.विद्यार्थी आचरण व अनुशासन संहिता | 14 |
| 12 | रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम (रॅगिंग कायदा 1999) | 15 |
| 13 | प्राध्यापक वृंद व कार्यालयीन कर्मचारी | 17 |
| 14 | | |



Office : 02385-269555
Principal : 8999213221
e-mail: rasikadeoni399@gmail.com
www.kairasikamahavidyalaya.com




Scanned with OKEN Scanner

## Vision Of The Institute

1. To provide accessibility towards higher education in rural areas
2. To impart quality education
3. To educate, self-dependent & empower rural students

## Mission of the Institute

To make real & practical oriented lives of rural students through holistic education.

## Objectives of the Institute

1. In order to cater to the educational needs of students belonging to various villages in an around Deoni and adjacent Talukas in Maharashtra and border disputed villages in Karnataka.
2. To bring about all round development in the rural students educationally, socially andculturally.
3. To develop scientific attitude and approach in the student.
4. To prepare the student to face global challenges.
5. To create ability amongst student to handle modern tools and technology.
6. To make the student self-sufficient and self-dependent by offering add-on courses.

## * महाविद्यालयाची वैशिष्ट्ये *

1. अनुभवी, तज्ञ प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग
2. अभ्यासाचे नियोजन व नियोजनपूर्वक अंमलबजावणी
3. दोन मजली भव्य इमारत
4. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम व शिबीराचे आयोजन
5. अद्ययावत प्रयोगशाळा
6. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
7. स्वतंत्र संगणक विभाग
8. विविध विषयात सहलीचे आयोजन
9. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिकचे मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्र
10. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम उपलब्ध
11. कॉलेज कँटीन सुविधा
12. सुसज्ज संगणकीकृत ग्रंथालय व अद्यावत वाचन कक्ष



Scanned with OKEN Scanner

13. विद्यार्थी तक्रार निवारण केंद्र
14. स्वतंत्र महिला कक्ष
15. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी मासिक व सत्र परीक्षा
16. क्रीडा स्पर्धाचे आयोजन व विविध खेळाची मैदाने
17. तज्ञांकडून वेळोवेळी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन
18. स्टेज, ऑडीटोरियम, कॉन्फरन्स हॉल उपलब्ध
19. कौशल्य विकास अभ्यासक्रम
20. सी.सी.टिव्ही कॅमे–याची सुविधा

## * महाविद्यालय प्रवेशाची नियमावली *

1. महाविद्यालयातून प्रवेश फॉर्म घ्यावा.
2. प्रवेश फॉर्म भरल्यानंतर तपासून घ्यावा.
3. प्रवेश फॉर्म सोबत सर्व प्रमाणपत्रे मूळप्रत टी.सी., मार्कमेमो यांच्या चार सत्यप्रती, जातीचा दाखला, आधार कार्ड, फोटो–04, पात्रता फॉर्म.
4. प्रवेश फॉर्म सोबत इ.बी.सी.फॉर्म व उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिका–याच्या सही शिक्यानिशी दोन प्रतीत सादर करावा
5. बी.एस्सी, बी.कॉम, बी.सी.ए., बी.सी.एस, प्रथम वर्षात प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यास पात्रता फॉर्म व फिस रू 110 भरावे लागतील. विलंबाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील.
6. महाराष्ट्र राज्याबाहेरील 12 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस पात्रता फॉर्म व मायग्रेशन सर्टिफिकेट फी सादर करावी लागेल.
7. प्रवेश फॉर्म वर नवीन फोटो व मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे.
8. कोणतीही कागदपत्रे महाविद्यालयात देताना त्याच्या काही सत्यप्रती स्वतःकडे ठेवून घ्याव्यात.
9. बोनाफाईड सर्टिफिकेटची मागणी करताना बिनचूक जन्मतारखेसाठी टिसीची सत्यप्रत व प्रवेशाची पावती जोडावी व हजेरी क्रमांक व वर्ग लिहावा.
10. पात्रता फॉर्मच्या त्रुटीची पुर्तता वेळेवर नाही केल्यास 500/– दंड विद्यापीठास भरावा लागेल.
11. मोबाईल नंबर व ई.मेल आयडी असणे बंधनकारक आहे



Scanned with OKEN Scanner

# महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम
## वाणिज्य विभाग (CBCS Pattern)

| Sem-I | Sem-II |
|---|---|
| 1.English | 1.English |
| 2.SL Marathi/Hindi | 2. SL Marathi/Hindi |
| 3.Financial Accounting- I | 3. Financial Accounting-II |
| 4.Fundamental of Statistics & Maths –I | 4. Fundamental of Statistics & Maths -II |
| 5.Business Economics- I | 5. Business Economics- II |
| 6.Business Communication-I | 6. Business Communication-II |
| 7.Computer for Business& Tally-I | 7. Computer for Business & Tally -II |

| Sem-III | Sem-IV |
|---|---|
| 1.English | 1.English |
| 2.SL Marathi/Hindi | 2. SL Marathi/Hindi |
| 3.New Trends in Corporate Accounting- I | 3.Advance Corporate Accounting |
| 4.Cost Accounting- I | 4. Advance Cost Accounting -II |
| 5.Principal of Business Management | 5. Risk Management |
| 6.Banking & Finance -I | 6. Advance planning in India |
| 7.Income Tax-I | 7. Income Tax -II |
| 8.Corporate Law | 8. Business Law |
| 9.Skill Enhancement course | 9. Skill Enhancement course |

| Sem-V | Sem-VI |
|---|---|
| 1.Advance Accounting & Auditing-I | 1 .Advance Accounting & Auditing -II |
| 2.Management Accounting-I | 2. Management Accounting-II |
| 3.Economic Development & Planning in India- I | 3. Economic Development & Planning in India –I |
| 4.Business Regulatory Framework- I | 4. Business Regulatory Framework -II |
| 5.Human Resource Management- I | 5. Human Resource Management - II |
| 6.Marketing Management -I | 6. Marketing Management –II |
| 7.Project Training & Work -I | 7. Project Training & Work -II |



Scanned with OKEN Scanner

## B.Sc. First Year

1) Compulsory: - English 2) Second Language: - Marathi / Hindi

3) Optional Subjects

Group - 1.Physics, Chemistry, Mathematics
2.Chemistry, Botany,Zoology½
3. Botany,Zoology, Comp.Sci.
4. Physics,Comp.Sci.,Mathematics)

## B.Sc. Second Year

The subjects selected for the first year will remain the same for the second year

1) Compulsory: - English

2) Second Language: - Marathi / Hindi

3) Optional Subjects

Group - 1. Physics, Chemistry, Mathematics
2. Chemistry, Botany,Zoology
3. Botany, Zoology, Comp.Sci.
4. Physics,Comp.Sci.,Mathematics

4) Skill Enhancement course

## B.Sc. Third Year

The optional subjects will remain the same

1) Optional Subjects

Group - 1.Physics, Chemistry, Mathematics
2.Chemistry, Botany,Zoology½
3. Botany, Zoology, Comp.Sci.
4. Physics,Comp.Sci.,Mathematics

2)Compulsory: - Environmental Studies

3) Skill Enhancement course.



Scanned with OKEN Scanner

## ANNEXURE 'A'

STATEMENT SHOWING DETAILS OF FEES STRUCTURE FOR ART'S COMMERCE & SCIENCE FACULTIES GRANTED AND NON-GRANTED COLLEGES.

### APPLICABLE FROM THE ACADEMIC YEAR 2018-19

| Sr. | Particulars | U.G. |
|---|---|---|
| 01 | Registration Fees | 10 |
| 02 | Admission Fees | 40 |
| 03 | Library Deposit | 100 |
| 04 | Laboratory Fees | 300 |
| 05 | Laboratory Fees (For B.Com, B.Sc.) | 150 |
| 06 | Magazine Fees | 40 |
| 07 | S. A. F. Fees | 10 |
| 08 | Game Fees (Gymkhana) | 50 |
| 09 | Gathering Fees | 60 |
| 10 | Library Fees | 150 |
| 11 | Student Welfare Fees | 60 |
| 12 | College Development Fees | 50 |
| 13 | Identity Card Fees | 10 |
| 14 | Student forum Fees (council) | 15 |
| 15 | Home Exam. Fees | 30 |
| 16 | Medical Examination Fees | 05 |
| 17 | University Sports Fees | 50 |
| 18 | Miscellaneous Fees (Other fees) | 20 |
| 19 | T. C. Fees | 50 |
| 20 | Book Bank | 10 |
| 21 | Youth Festival | 50 |
| 22 | Ashwamedh | 30 |
| 23 | Emergency Fees | 15 |
| 24 | Student Insurance Fees | 08 |
| 25 | Chancellor's office activities fees | 32 |
| 26 | Zonal Sports Council fees | 50 |
| | TOTAL | 1395 |

A) Tuition fees 1000 without scholarship & EBC form.

Tuition fees for Granted Arts, Commerce & Science faculty colleges: 1) UG-1000 2) PG- 1200

B) Project fees for UG & PG RR.50 (whenever applicable)

फिस संदर्भातील नविन नियमानुसार फिस बदलली असता त्यानुसार फिस स्विकारण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे खालील मान्यताप्राप्त अभ्यासक्रम

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | बी.कॉम.,प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष | १२ वी कला/ वाणिज्य विज्ञान किंवा मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण | ३ वर्ष |
| ०२ | बी.ए.प्रथम वर्ष | | ३ वर्ष |
| ०३ | वृत्तपत्र व जनसज्ञापन पदवी प्रथम वर्ष | | ३ वर्ष |
| ०४ | पूर्वतयारी | ७ वी,१० वी, १२ वी नापास | ६ महिने |

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | बी.कॉम. | १२ वी कला/ वाणिज्य विज्ञान | ३ वर्ष |
| ०२ | बी.ए. | | ३ वर्ष |
| ०३ | एम.ए.मराठी,हिंदी,इंग्रजी,अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र | बी.ए.उत्तीर्ण | २ वर्ष |
| ०४ | एम.कॉम. | बी.कॉम उत्तीर्ण | २ वर्ष |

## Prize From Honorable Persons

| | | |
|---|---|---|
| 01 | Late, Shanta Shrinivas Badade Prize | B.com, First Rank |
| 02 | Late, Shrinivas Bhanudas Badade Prize | B.Sc.First Rank |



Scanned with OKEN Scanner

# ग्रंथालय विभाग नियमावली

1. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश पावती व ओळखपत्र सादर केल्यानंतर पुस्तके मिळतील.
2. सेमिस्टर असल्यास अगोदरच्या सेमिस्टरची पुस्तके परत करून पुढच्या सेमिस्टरची पुस्तके घ्यावीत.
3. वार्षिक परीक्षेचे हॉलतिकीट घेण्यापूर्वी ग्रंथालयातून घेतलेली सर्व पुस्तके परत करणे अनिवार्य आहे.
4. पूर्वी घेतलेली सर्व पुस्तके परत केल्याशिवाय पुढील वर्गाची पुस्तके मिळणार नाहीत.
5. पुस्तक दिलेल्या तारखेपासून एका आठवडयाच्या आत विद्यार्थ्यांने पुस्तक परत केले पाहिजे या अवधीत त्याने पुस्तक परत न केल्यास त्या नंतरच्या दर दिवसाला 1 रूपये प्रमाणे दंड आकारला जाईल.
6. पुस्तकावर कसल्याही प्रकारच्या खुणा करण्यास, अधोरेखीत करण्यास (अंडरलाईन करणे) नावे टाकण्यास, काहीही लिहिण्यास किंवा त्यातील पाने फाडण्यास सक्त मनाई आहे. पुस्तकास कोणत्याही प्रकारची हानीपोंहचल्यास त्याची भरपाई करून द्यावी लागेल.
7. अभ्यासिकेतील राखीव ग्रंथ व नियतकालीके (दैनिक, साप्ताहिके, मासिके इ.) घरी वाचण्यासाठी दिली जाणार नाहीत.
8. उशिरा पुस्तके परत करणा–यांना व गहाळ करणा–यांना नियमाप्रमाणे दंड आकारला जाईल.
9. ग्रंथालय वेळापत्रक – सकाळी 10:00 ते सायं. 05:00 पर्यंत, अभ्यासिका सकाळी 09:00 ते सांय. 05:00 पर्यंत
10. अभ्यासिका–ग्रंथालय विभागातर्फे विद्यार्थी, विद्यार्थीनीसाठी अभ्यासिकेची सोय आहे. महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. त्यांना घरी जागेची अडचण असते. फर्निचर उपलब्ध नसते. त्यासाठी अभ्यासिकेत क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, व इतर उपयुक्त ग्रंथ, ठेवण्यात आले आहेत. ग्रंथ येथेच बसून वाचावेत.

पदवी वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन ऐच्छिक विषयाच्या पुस्तकाशिवाय द्वितीय भाषा किंवा अनिवार्य विषयाचे एक पुस्तक आठवड्यासाठी दिले जाते. कोणतेही पुस्तके वर्षभर ठेवून घेण्यासाठी दिलेली नसून ती बदलून घ्यावीत त्यामुळे सर्व मुलांना पुस्तकाचा लाभ होईल.

**अधिक माहितीसाठी ग्रंथपाल डॉ. एस.एन.सोनटक्के यांना भेटावे.**



Scanned with OKEN Scanner

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS)

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग सक्रीयतेने कार्यरत आहे. या विभागात डॉ.पी.आर.मोरे हे कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्य पाहत आहेत. महाविद्यालयास एका युनिटची मान्यता आहे.

* प्रवेश क्षमता:– 50
* प्रवेश प्रात्रता– महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम व ,द्वितीय वर्षात प्रवेश असावा.
* समाजकार्याची आवड असावी.
* महाविद्यालयातील प्रवेश पावती दाखवून एन.एस.एस. विभागाचा प्रवेश फॉर्म भरून दिला पाहिजे.

## शिष्यवृत्ती विषयक माहिती

महत्वाची सुचना

खालील कोणत्याही शिष्यवृत्ती अथवा फीस सवलत मिळवण्यासाठी स्वत: विद्यार्थ्यांने बोर्ड किंवा विद्यापीठ परीक्षेचे फॉर्म भरणे आवश्यक आहे. अन्यथा कोणतीही फीस किंवा शिष्यवृत्ती सवलत मिळणार नाही. व महाविद्यालयाची संपूर्ण फीस भरावी लागेल याची सबंधीतानी नोंद घ्यावी.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी व शिष्यवृत्तीसाठी लागणारे कागदपत्र – 1. टि.सी.झेरॉक्स (पूर्वी पास झालेले) 2. मार्कमेमो झेरॉक्स (पुर्वी पास झालेले) 3. मार्कमेमो झेरॉक्स (दहावी) 4. जातीचे प्रमाणपत्र 5. ओरिजनल उत्पन्न प्रमाणपत्र 6. आधार कार्ड 7. पासपोर्ट साईज फोटो 8. आधार लिंकीग फॉर्म पावती 9. बॅक पासबुक झेरॉक्स – राष्ट्रीयकृत बॅकेचे 10. द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी चालू वर्षाचे बोनाफाईड 11. शासनाच्या सुचनेप्रमाणे महाविद्यालयात सूचना फलकावर वेळोवेळी सूचीत केलेली कागदपत्र 12. रहिवाशी प्रमाणपत्र / नॅशनेलीटी प्रमाणपत्र



Scanned with OKEN Scanner

## ई.बी.सी.

1. उत्पन्नाचा दाखला 1,00,000 लाख च्या आतील असणे आवश्यक आहे.
2. अर्जदाराने चुकीची माहिती अथवा पालकाच्या उत्पन्नाचा खोटा दाखला दाखवला किंवा या योजनेचा कोणताही दुरूपयोग केल्यास त्याची फीस माफीची सवलत रद्द केली जाईल व मिळालेल्या फीस माफीच्या दुप्पट रक्कम जमीन महसूल थकबाकी व वसूली खालील नियमानुसार वसूल केली जाईल. तसेच अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.
3. स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्यांनी सुध्दा ई.बी.सी.फॉर्म भरून द्यावे.
4. ई.बी.सी. फॉर्म बरोबर रहिवाशी प्रमाणपत्र / नॅशनेलीटी प्रमाणपत्र

वेगळे देणे आवश्यक आहे.

5. बॅंक पासबुक झेरॉक्स – राष्ट्रीयकृत बॅंकेचे
6. आधार लिंकीग फॉर्म पावती
7. शासनाच्या सुचनेप्रमाणे महाविद्यालयात सूचना फलकावर वेळोवेळी सूचित केलेली कागदपत्र.

टिप– सत्र परीक्षा पध्दतीत विद्यापीठाकडून वर्षभरात प्रत्येक क्षेत्रात एक परीक्षा अशा एकूण दोन परीक्षा घेतल्या जातात या दोन्ही परीक्षेचा फॉर्म भरणे आवश्यक आहे.

## महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती

1. विद्यार्थ्यांनी नवीन अर्ज सादर करताना शाळेचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, गुणपत्रिका तसेच ज्या विद्यार्थ्यांचे वडील हयात नाहीत त्यांनी सक्षम अधिका –याचा त्यासंबंधीचा दाखला इ.कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
2. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची जात टी.सी.वर लिहिलेली असावी.
3. विद्यार्थ्यांचे जातीचे दाखला उपविभागीय अधिकारी यांनीच प्रमाणित केलेला असावा.
4. विद्यार्थ्यांच्या पालकाचा उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांनी दिलेला असावा.
5. पालकांचे उत्पन्न सर्व मार्गाने मिळूण 100,000 हजार पेक्षा जास्त नसावे.



Scanned with OKEN Scanner

6. विद्यार्थ्यांने दुस–या महाविद्यालयातून, शाळेतून आल्यास तसे प्रमाणपत्र समाज कल्याण वर्ग 01 यांच्याकडून घेवून ते अर्जासोबत जोडावे.
7. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्षात अन्य कारणाने खंड पडल्यास त्या संबंधीचे प्रतिज्ञा पत्र तहसिलदाराकडून प्रमाणित केलेले असावे.
8. शिष्यवृत्ती फॉर्म हा ऑनलाईन भरावा फॉर्मवर स्वतःची व पालकाची सही असावी.
9. दरवर्षी शिष्यवृत्ती फॉर्म भरणे आवश्यक आहे.
10. शिष्यवृत्ती फॉर्म स्विकारण्याची अंतिम दिनांक 30 जुलै 2018 राहील.
11. शिष्यवृत्ती ऑनलाईन फॉर्म स्वतः विद्यार्थ्यांनी भरावा. व त्याचे प्रिंन्ट सर्व आवश्यक कागदपत्रासह महाविद्यालयात द्यावा.
12. बॅंकेचे आधार लिंक केलेली पावती सोबत जोडावी.

## कर्नाटक राज्यातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती

1. कर्नाटक राज्यातील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी स्वतः नाव नोंदणी करावी व स्वतः फॉर्म भरून घेवून यावा.
2. फॉर्मवर स्वतःचा फोटो लावून व त्यावर स्वाक्षरी करून जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडून सबंधीताकडे फॉर्म द्यावा.
3. सर्व आवश्यक कागदपत्रासह फॉर्म सबंधीताकडे द्यावा.
4. दरवर्षी शिष्यवृत्ती फॉर्म भरणे आवश्यक आहे.
5. शिष्यवृत्ती फॉर्म स्विकारण्याची अंतिम दिनांक 30 जुलै 2018 राहील. मुदतीनंतर फॉर्म सादर केला गेल्यास शिष्यवृत्तीच्या मंजूरीबाबत जबाबदारी सबंधीत विद्यार्थ्यांवर राहिल.

## भारत सरकार अपंग शिष्यवृत्ती

अपंग शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना विद्यार्थ्याने पुढील नियम लक्षात घ्यावेत.
1. वार्षीक परीक्षेत 40 टक्के हून अधिक गुण घेतलेले असावेत.
2. वार्षीक उत्पन्न 36000 हजार रूपये पेक्षा जास्त नसावे नौकरी करत असल्यास (3000 हजारापेक्षा) जास्त नसावे. उत्पन्नाचा दाखला तहसिलदाराकडून घेतलेला सादर करावा.
3. अपंगत्व स्पष्ट दिसेल असा फोटो काढावा.
4. अर्जासोबत गुणपत्रिका व उत्पन्नाचा दाखला जोडावा.
5. अर्ज विहीत नमुन्यामधे ठराविक तारखेच्या आत सादर करावा.



Scanned with OKEN Scanner

6. जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून घेतलेले वैद्यकिय प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
7. शासकीय वसतिगृहात राहत असल्यास त्या बाबतचा दाखला जोडावा
8. अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक 10 ऑगस्ट 2018 राहिल.
9. 40 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्यास अर्ज करावे.
10. इयत्ता 12 वी, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष, च्या विद्यार्थ्यांनी नुतनीकरण अर्ज करावे.
11. महाराष्ट्र शासनाची गुणवत्ता शिष्यवृत्ती स्कॉलरशिप 12 वी मध्ये 75 टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करणा–या विद्यार्थ्यांना प्राप्त होवू शकतो.
12. वरील नियमानुसार अर्ज न केल्यास आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

## अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्रशासनाची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती

मॅट्रीकोत्तर ते पीएच.डी. पर्यंतच्या अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यासाठी केंद्रशासनाने सन 2007–08 पासून ही शिष्यवृत्ती चालू केलेली आहे. सबंधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म स्वत: भरून आवश्यक कागदपत्रासह सबंधीताकडे जमा करावा.

अधिक माहितीसाठी श्री.व्ही.व्ही.पांढरे यांना भेटावे.

## विद्यार्थ्यांसाठी राबविले जाणारे उपक्रम/योजना

### 1.विद्यार्थी कल्याण मंडळ–

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994 नुसार 2017–18 नुसार या शैक्षणिक वर्षासाठी गुणवत्तेनुसार महाविद्यालयातील वर्ग प्रतिनिधीची विद्यार्थी संसदेसाठी नियुक्ती केली जाईल. याशिवाय खालील विभागातून प्रत्येकी एक विद्यार्थी प्रतिनिधी निवडला जाईल. 1. क्रीडा विभाग 2.राष्ट्रीय सेवा योजना 3.सांस्कृतिक विभाग 4.प्राचार्य नियुक्त 2 विद्यार्थीनी प्रतिनिधी

### 2. राष्ट्रीय सेवा योजना–

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, श्रमप्रतिष्ठा व कला गुणाच्या विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी रक्तदान, श्रमदान, कला पथक, नैसर्गिक आपत्ती नियोजन, आरोग्य तपासणी, अंधश्रध्दा निर्मुलन इत्यादी उपकम राबविले जातात. प्रतिवर्षी ग्रामीण भागात आठ दिवसाचे युवक शिबीर आयोजित केले जाते.



Scanned with OKEN Scanner

**3.व्यक्तीमत्व विकास–**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास व्हावा यासाठी नामवंत व्यक्तींची व्याख्याने आयोजित केले जातात. मुलांवर नैतिक संस्कार व्हावेत म्हणून यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. वक्तृत्व, वाद–विवाद इत्यादी स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांची तज्ञ प्राध्यापकांकडून तयारी करून घेतली जाते.

**4.वार्शिक अंक–**

दरवर्षी आपल्या महाविद्यालयात 'रसिक' हा वार्षिक अंक प्रकाशित होतो. या अंकासाठी विद्यार्थी, विद्यार्थीनी आपले साहित्य, कथा, कविता, व्यंगचित्रे इ. मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतून देवू शकतात.

**5.भिंतीपत्रके–**

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून विज्ञान विभागातर्फे प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित व वाणिज्य विभागातर्फे वेगवेगळे विषयावर व मराठी, हिंदी, इंग्रजी, या विषयात भिंतीपत्रके काढण्यात येतात.

**6.मौलिक षिक्षण सुविधा–**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी सामाजिक व नैतिक मुल्यांची आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाची जोपासना व्हावी. यासाठी वेळोवेळी तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजि केली जातात.

**7.महाविद्यालय व संषोधन केंद्र व उद्योग प्रतिश्ठान परस्पर सबंध –**

केवळ पुस्तकी ज्ञान संपादन करून जीवनात यशस्वी होता येत नाही त्यासाठी प्रत्यक्ष कार्यानुभव घ्यावा लागतो. म्हणून विविध शिक्षण व संशोधन संस्था, व्यवसाय व औद्योगिक प्रतिष्ठाने येथे थेट मार्गदर्शन केले जाते.

**8.संस्कृतीक मंडळ–**

विद्यार्थी, विद्यार्थीनीच्या गायन, अभिनय, नाट्य, विनोद, वाचन, नृत्य, इ. सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी हे मंडळ कार्य करते. वरील प्रकारांच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धा, विद्यापीठाचा युवक महोत्सव, इ. मध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व संधी देण्याचे कार्य ही मंडळ करते.

**9.विज्ञान मंडळ–**

एकविसावे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. विद्यार्थ्यांमध्ये शास्त्रीय दृष्टीकोन रूजविण्यासाठी प्रश्नमंच विज्ञान प्रदर्शन भिंतीपत्रके, विद्यापीठ स्तरावरील अविष्कार स्पर्धेसाठी इ. उपक्रम राबविले जातात. अत्याधुनिक सोयीनीयुक्त असा संगणक कक्ष महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहे.



Scanned with OKEN Scanner

**10.वाणिज्य मंडळ—**

विद्यार्थ्यांनी वाणिज्य व्यवसाय विषयाचा अभ्यास करून त्यांचा वैयक्तीक व सामाजिक जीवनात उपयोग करावा या उद्देशाने हे मंडळ चालविले जाते. या विषयातील नामवंत व यशस्वी उद्योजकांची व्याख्याने हे मंडळ आयोजित करते. तसेच विद्यार्थ्यांसाठी औद्यौगिक सहलीचे आयोजन केले जाते

**11. आर्थिक साक्षरतेकरिता प्रशिक्षण :**

महाविद्यायाने दयानंद वाणिज्य महा. सोबत SEBI या संस्थेअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी आर्थिक साक्षरतेकरिता समझोत्याचा करार केला आहे.

**12.शैक्षणिक सहल—**

प्रत्येक विभाग विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी शैक्षणिक सहलीचे आयोजन करते.

13.स्पर्धा परीक्षा व बॅकीग व इतर स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन वर्ग—

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी या परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.

**14.विविध समित्या—**

महाविद्यालयात विद्यार्थी, व विद्यार्थीनीसाठी यांच्यासाठी तक्रार निवारण, महिला विकास कक्ष, रॅगिंग इत्यादी समित्या काम करतात.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## विद्यार्थी आचरण व अनुशासन संहिता

1. आपल्या मागण्या अडचणी, तक्रार इत्यादी प्रशासनासमोर सनदशीर व शांततामय मार्गानेच सादर कराव्यात.
2. वर्गातील अध्यापन कार्यात व्यत्यय येईल असे वर्तन किंवा कृत्य करू नये.
3. वसतिगृह/महाविद्यालय/विद्यापीठ परीसरात कुलगुरू/महाविद्यालयाचे प्राचार्य, यांच्या पूर्व व विशेष परवानगीशिवाय एखादी संघटना स्थापन करणे व तिच्यात सहभाग घेणे किंवा विद्यार्थ्यांना संबोधित करणे हे गैरकृत्य मानले जाईल.
4. महाविद्यालयात किंवा विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा गैर फायदा घेण्यासाठी, चुकीची विधाने करणे, चुकीची माहिती प्रस्तुत करणे, तसेच प्रमाणपत्रे किंवा भिंतीवर लिहिणे, इतर कोणत्याही दस्तऐवजामध्ये अनाधिकृतरित्या खाडाखोड करण्याच्या कृतीमध्ये सहभागी होवू नये असे करणे गंभीर स्वरूपाचा गुन्हा ठरतो.
5. धुम्रपान, तंबाखूसेवन, गुटखा, मद्यपान, मादक द्रव्ये आाणि गुंगी/नशा आणणा—या पदार्थांचे सेवन निषेधार्थ मानले जाईल.



Scanned with OKEN Scanner

6. वसतिगृह / महाविद्यालय / विद्यापीठ परिसरात कसल्याही स्वरूपाची रॅगिंग करण्यामध्ये सहभागी होऊ नये.
7. वसतिगृह / महाविद्यालय / विद्यापीठाच्या साधन संपत्तीची नासधूस किंवा विद्रुप करण्याच्या कृतीत सहभागी होऊ नये.
8. कोणत्याही कारणास्तव अध्यापन कार्यावर सामुदायिक बहिष्कार घालू नये. सामुदायिक सुट्टी पाळू नये.
9. वसतिगृह / महाविद्यालय / विद्यापीठाच्या परिसरात पक्षीय / सांप्रदायिक स्वरूपाच्या परीसराच्या हालचालीमध्ये सहभागी होवू नये.
10. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994 च्या अंतर्गत तयार केलेले अधिनियम अध्यादेश आणि नियम यांचा भंग करण्याच्या कोणत्याही कृतीत सहभागी होवू नये.

## रॅगींग प्रतिबंधक अधिनियम (रॅगिंग कायदा १९९९)

रॅगिंग करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे. रॅगिंगच्या वाढत्या घटनांमुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने 2009 मध्ये रॅगिंग करणा–याला कठोर शिक्षेची तरतूद असलेल्या अधिनियम प्रसारित केला. रॅगिंगसंदर्भात या विद्यापीठात रॅगिंग प्रतिबंधक समिती स्थापन करण्यात आली असून या अधिनियमाची कठोर अमंलबजावणी विद्यापीठात केली जाणार आहे. रॅगिंग हा दुस–या विद्यार्थ्यांना शारीरिक किंवा मानसिक क्लेष होईल असे वर्णन करण्याचा एक घृणास्पद अमानवी व विकृत प्रकार आहे. रॅगिंगमुळे निष्पाप विद्यार्थ्यांचे खच्चीकरण तर होतेच, परंतु रॅगिंगमुळे प्रसंगी एखाद्या विद्यार्थी प्राणासही मुकू शकतो. रॅगिंगमध्ये खालील बाबींचा अंतर्भाव होतो.

* नवप्रवेशित विद्यार्थ्यांना बोलून, लिहून,चिडवून, उध्दटपणे वागून त्याला / तिला मानसिक किंवा शारीरिक इजा पोहचविणे.
* इतरांची मानहानी करणारे व लज्जा उत्पन्न करणारे वर्तन करणे.
* नवप्रवेशित विद्यार्थ्यांवर वरिष्ठत्वाच्या नात्याने जोरजुलूम करणे, दहशत उत्पन्न करणे, सत्ता प्रस्थापित करणे, त्यांना शिक्षा देणे इत्यादी.
* प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे इतर विद्यार्थ्यांना त्रास देणारी कोणतीही कृती करणे.
* रॅगिंग करणा–याला शिक्षा :–

या अधिनियमात रॅगिंग करणा–या विद्यार्थ्याला कठोर शिक्षेची तरतूद आहे. दोषी विद्यार्थ्याला खालीलपैकी एक अथवा अधिक शिक्षेस सामोरे जाणे लागेल.

- वर्गात बसणे व इतर शैक्षणिक लाभांपासून वंचित करणे.
- शिष्यवृत्ती, फेलोशिप यापासून वंचित करणे.
- परीक्षेसाठी अपात्र ठेवणे
- निकाल राखून ठेवणे.
- कोणत्याही युवक महोत्सव, स्पर्धेमध्ये सहभागास प्रतिबंध करणे.
- एक ते चार सत्रांपर्यंत निलंबित करणे.
- शिक्षण संस्थेतील प्रवेश रद्द करणे, तसेच इतर कोणत्याही शिक्षण संस्थेत काही काळासाठी प्रवेशापासून वंचित करणे.

आणिबाणीच्या प्रसंगी विद्यार्थी/विद्यार्थिनींनी रॅगिंग प्रतिबंधंक समितीकडे संपर्क साधावा. महाविद्यालयात किंवा महाविद्यालय परिसरात रॅगिंगला बंदी पाळण्यात आली आहे. जे कोणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या रॅगिंग करण्यास मदत करतील. अशा विद्यार्थ्यांना 2 वर्षे कैदेची शिक्षा व दंड रू. 10,000/– पर्यंत बसेल तसेच रॅगिंग करणा–यांना महाविद्यालयातून 5 वर्षासाठी काढून टाकण्यात येईल. यानंतर इतरत्र कोठेही प्रवेश मिळणार नाही. याची नोंद घ्यावी.

प्राचार्य

कै. रसिकामहाविद्यालय, देवणी

ता. देवणी जि. लातूर



Scanned with OKEN Scanner

# प्राध्यापक वृंद

| प्राध्यापकाचे नाव | पदनाम |
|---|---|
| डॉ.कुणाल एस.बडदे | प्राचार्य |
| **क्रीडा विभाग** | |
| डॉ.एस.एस.चामले | क्रीडासंचालक |
| **ग्रंथालय विभाग** | |
| डॉ.एस.एन.सोनटक्के | ग्रंथपाल |
| **रसायनशास्त्र विभाग** | |
| डॉ.व्ही.एस.मोरे | विभाग प्रमुख |
| प्रा.बी.पी.अंकुश | |
| डॉ.सी.एम.मलबा | |
| **प्राणीशास्त्र विभाग** | |
| डॉ.पी.आर.मोरे | विभाग प्रमुख |
| डॉ.एस.एस.पेडगे | |
| **वनस्पतीशास्त्र विभाग** | |
| डॉ.व्ही.एस.चटगे | विभाग प्रमुख |
| | |

| प्राध्यापकाचे नाव | पदनाम |
|---|---|
| **भौतिकशास्त्र विभाग** | |
| डॉ.आर.एन.कुनाळे | विभाग प्रमुख |
| **गणित विभाग** | |
| डॉ.वाय.एम.मुळे | विभाग प्रमुख |
| **वाणिज्य विभाग** | |
| डॉ.जी.व्ही.सोमाणी (विभाग प्रमुख) | वि.प्र.बिझनेस इकॉनॉमी क्लास |
| डॉ.एस.एस.डेंगाळे | वि.प्र.अकाऊंट अँन्ड स्टॅटीस्टीक्स |
| प्रा.ए.एन.भुसावळे | वि.प्र.मर्क्युरी लॉ |
| **संगणक विभाग** | |
| प्रा.एस.बी.धनशेट्टे | विभाग प्रमुख |
| **इंग्रजी विभाग** | |
| प्रा.एम.एन.टेंकाळे | विभाग प्रमुख |
| **मराठी विभाग** | |
| प्रा.पी.एस.भंडे | विभाग प्रमुख |
| **हिंदी विभाग** | |
| प्रा.रंजना बिरादार | विभाग प्रमुख |

# कार्यालयीन कर्मचारी

| कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|
| श्री.एस.वाय.मोरे | मुख्य लिपीक |
| सौ.जी.एम.लांडगे | वरिष्ठ लिपीक |
| श्री.डी.जी.पाटील | कनिष्ठ लिपीक |
| श्री.एस.एस.मोहिते | प्रयोगशाळा सहायक |
| श्री.व्ही.एस.भोजने | प्रयोगशाळा परीचर |
| श्री.पी.एन.मोरे | प्रयोगशाळा परीचर |
| श्री.व्ही.व्ही.पांढरे | प्रयोगशाळा परीचर |
| श्री.व्ही.के.बिरादार | प्रयोगशाळा परीचर |
| श्री.डी.एन.रणदिवे | ग्रंथालय परीचर |
| श्री.एस.एम.मुळे | सेवक |
| श्री.एस.बी.पांचाळ | सेवक |
| श्री.एस.डी.म्हेत्रे | सेवक |
| श्री.व्ही.के.बिरादार | सेवक |



Scanned with OKEN Scanner




महाविद्यालयातील IQAC आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी मा.जी.श्रीकांत व्यासपीठावर मा.गोविंदरावजी भोपणीकर साहेब व इतर मान्यवर



आंतर महाविद्यालयीन पॉवरलिफ्टींग, वेटलिफ्टींग, बॉडीबिल्डींग स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करताना मा.गजानन भोपणीकर साहेब व इतर मान्यवर



जागतिक गणित दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भिंतीपत्रकाचे उद्घाटन करताना संस्थाध्यक्ष मा.गोविंदरावजी भोपणीकर साहेब व डॉ.करंडे बी.डी. इतर मान्यवर



महाविद्यालयातील क्रीडाविभागास सदिच्छा भेट देताना मा.जी.श्रीकांत व्यासपीठावर मा.गोविंदरावजी भोपणीकर साहेब व इतर मान्यवर




आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत विद्यापीठात तृतीय क्रमांक प्राप्त खेळाडू कोणे शेषेनाथ यांचा सत्कार करताना मा.कुलगुरु डॉ.पंडीत विद्यासागर व क्रीडा संचालक डॉ.मनोज रेड्डी व माजी व्यवस्थापन सदस्य डॉ.पी.एन.देशमुख



रसायनशास्त्रे आयुर्वेदात व दैनंदिन जीवनातील महत्व या विषयावर व्याख्यान देताना डॉ.नारायण जाधव व उपस्थित मान्यवर

Scanned with OKEN Scanner




प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या भीतीपत्रकाचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी मा.जी.श्रीकांत व इतर मान्यवर



युवती कल्याण विभागातर्फे महाविद्यायातील विद्यार्थीनीसाठी आरोग्य विषयावर बोलताना डॉ.शितल घोरबड



वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित आनंदनगरीतील विविध स्टॉलला भेट देताना संस्थासचिव मा.गजानन भोपणीकर साहेब व प्राचार्य डॉ.कुणाल बडदे व इतर मान्यवर



वाणिज्य विभाग व IQAC तर्फे देवणी परिसरातील व्यापाऱ्यासाठी G.S.T. या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना वस्तू व सेवाकर अधिकारी श्री गवंडी साहेब व डॉ.सौदागर व इतर मान्यवर



वार्षीक स्नेहसंमेलना निमित्त आयोजित विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थासचिव मा.गजानन भोपणीकर साहेब यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करताना.



महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रक्तदानाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.शेटकार (नागप्पा अंबरखाने, ब्लड बँक,उदगीर)

Scanned with OKEN Scanner





आंतरविद्यापीठीय क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभाग नोंदवला घेतल्या बद्दल महाविद्यालयातर्फे सत्कार करताना डॉ.सुनिल साळुंके व संस्थासचिव मा.गजानन भोपणीकर साहेब व इतर मान्यवर



महाविद्यालयातील विद्यार्थीनीसाठी आरोग्यतपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करताना.



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ.सत्यशील सावंत व उपस्थित मान्यवर.




वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थीनी नृत्य सादर करताना.



रसिक या वार्षीक अंकाचे प्रकाशन संस्थासचिव मा.गजानन भोपणीकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले




विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमा बोलताना प्रमुख पाहुणे डॉ.भालचंद्र करंडे, व व्यासपीठावर डॉ.आलापुरे व प्राचार्य डॉ.कुणाल बडदे व डॉ.विजय मोरे.

Scanned with OKEN Scanner



भौतिकशास्त्र विभागातर्फे आयोजित सेमीनार मध्ये सहभागी विद्यार्थी



महाविद्यालयातील आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन बुध्दीबळ स्पर्धेत यशस्वी ठरलेले विद्यार्थी व सोबत पंच महविद्यालयातील प्राचार्य डॉ.कुणाल बडदे व प्राध्यापक वर्ग




NIAM चे संचालक अभय चोप्रा यांच्याकडून FINLIT साठी सर्वाधिक स्पर्धक रसिका महाविद्यालयाचे असल्यामुळे देण्यात आलेला पुरस्कार स्विकारताना प्रा.अंकुश भुसावळे व डॉ.गोपाळ सोमाणी



विद्यापीठातर्फे आयोजित युवक महोत्सवात महाविद्यालयातील विद्यार्थी, गीत सादर करताना शुभम भोजणे व सोबत डॉ.एस.एस.पेडगे.



लातूर येथे जिल्हास्तरीय ‘स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक’ स्पर्धेत बोलताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी कु.विजयाला शिवणखेडे



वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित शैक्षणिक सहल Skill enhancement course व मध्ये सहभागी विद्यार्थी



तालुका स्तरीय मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सत्कार करताना मान्यवर



'महिला सक्षमीकरण काळाची गरज' या विषयावर आयोजित कार्यक्रमात बोलताना भुमाता ब्रिगेडच्या संस्थापक मा.तृप्ती देसाई




स्वा.रा.ती.म.विद्यापीठ व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय यांच्या सयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत यश मिळवल्याद्दल कोणे शेषेनाथ याचा सत्कार करताना मान्यवर




स्वा.रा.ती.म.विद्यापीठ व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालय मैदानी स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल आकाश घाडगे याचा सत्कार करताना मान्यवर




वाणिज्य विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात बचतीचे महत्व व सेबी या विषयावर व्याख्यान देताना डॉ.सारीका दायमा



प्राणीशास्त्र विभागातर्फे शैक्षणिक सहलीमध्ये मत्स्य उत्पादन संदर्भात भेट देताना विद्यार्थी, विद्यार्थीनी व डॉ.एस.एस.पेडगे.

Scanned with OKEN Scanner







# Futue Plan...

संगमेश्वर/९७३०३५४८७०

Scanned with OKEN Scanner